# मुंबई विमानतळावर १० कोटी ७५ लाखांचे सोने जप्त

## सहाजणांना अटक, विमान कंपनीतील कंत्राटी कर्मचारी, पाच बांगला देशी प्रवाशांचा समावेश

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

मुंबईच्या आंतरराष्ट्रीय विमानतळामार्गत परदेशी सोने तस्करी करणाऱ्या आंतरराष्ट्रीय टोळीचा महसूल गुप्तवार्ता संचालनालयाने (डीआरआय) पर्दाफाश केला आहे. या कारवाईत ६ किलो ६५० ग्रॅम परदेशी सोने जप्त करण्यात आले. त्याची किंमत सुमारे १० कोटी ७५ लाख रुपये आहे. या प्रकरणात विमान कंपनीतील कंत्राटी कर्मचारी आणि पाच बांगला देशी प्रवाशांसह सहाजणांना अटक करण्यात आली आहे.



डीआरआयच्या मुंबई विभागाला सोने तस्करीत सहभागी असलेल्या मुनाफ जमादार (२३) याच्याबाबत माहिती मिळाली होती. तो विमान कंपनीत विमानतळावरील कंत्राटी कर्मचारी म्हणून काम करत असल्याचे तपासात समोर आले. जमादारच्या झडतीत पँटच्या मागील खिशातून मेणामध्ये लपवलेली सोन्याची भुकटी असलेल्या ७ कॅप्सूल आढळल्या. त्यानंतर विमानतळाबाहेर सोने स्वीकारणाऱ्या व्यक्तीपर्यंत सोने पोहोचविण्याच्या टोळीचा तपास पुढे केला गेला. या चौकशीत मुंबईमार्गे दुबई, बँकॉक आणि माले येथे ये-जा करणाऱ्या पाच बांगला देशी प्रवाशांचा या तस्करीत सहभाग असल्याचे समोर आले. मोहम्मद मोहिउद्दीन (३६), मोहम्मद इस्माईल होसेन (३७), मोहम्मद राशेदुल आलम (३८), मोहम्मद अबू नसर (३८) आणि मोहम्मद नझीमुद्दीन (३०) यांना अटक करण्यात आली. या तस्करीमुळे सरकारचा सुमारे ३ कोटी ७६ लाख रुपयांचा सीमाशुल्क महसूल बुडाल्याचा अंदाज आहे. जप्त केलेल्या सोन्याचा स्रोत, ते कोणाकडे पोहोचवले जाणार होते आणि या संपूर्ण तस्करीमागे आणखी कोणाचा सहभाग आहे, याचा तपास सुरू आहे.

# सप्टेंबरच्या पहिल्या पंधरवड्यासाठी तब्बल १३ लाख टनांचा साखर कोटा

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

पुढारी वॉच

केंद्र सरकारने साखरेची दरपातळी सामान्यांच्या आवाक्यात येण्यासाठी आणखी पावले उचलली असून, सप्टेंबरच्या पहिल्या पंधरवड्यासाठी १३ लाख टनांचा मुबलक कोटा जाहीर केला आहे. त्यामुळे कारखानास्तरावर साखरेच्या निविदांमधील दर सोमवारपासून (३१ ऑगस्ट) मंदीकडे झुकण्याचा अंदाज वर्तविण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर घाऊक बाजारातही दर खाली येण्याची शक्यता जाणकारांकडून वर्तविण्यात आली.

केंद्र सरकारने साखर बाजाराच्या इतिहासात प्रथमच रविवार असूनही सुट्टीच्या दिवशी साखरेचा कोटा खुला केल्याबद्दल आश्चर्य व्यक्त होत आहे. यावरून केंद्र सरकार साखरेच्या दरपातळीवर करडी नजर ठेवून असल्याचे स्पष्ट होत आहे.

मागील आठवड्यात घाऊक बाजारातस एस ३० ग्रेड साखरेचे दर घटून क्विंटलला ५५०० रुपयांपर्यंत खाली आलेले आहेत. तर कारखान्यांवरील साखर निविदाही ४८०० ते ५००० रुपयांपर्यंत खाली आल्याचे चित्र आहे. सर्वजण सप्टेंबर महिन्यासाठी केंद्र सरकार किती कोटा जाहीर होणार, याकडे डोळे लावून बसले होते. कारण बाजारात जादा दराने खरेदी केलेल्या साखरेची उपलब्धता आहे. सप्टेंबरच्या पहिल्या पंधरवड्यासाठी आता कोटाच मुबलक दिल्यामुळे बाजाराची मनोवृत्ती मंदीकडे झुकली आहे. त्यामुळे सोमवारी याबाबतचे चित्र स्पष्ट होईल, अशी माहिती व्यापाऱ्यांनी दिली.

**विक्रीनंतर ४० टक्के साखर हवी कारखान्याबाहेर**

सप्टेंबर २०२६ पासून साखर विक्रीचे नियम पूर्णपणे बदलत आहेत. संपूर्ण महिन्याऐवजी आता पहिले १५ दिवस व नंतर १६ ते ३० तारीख असे १५ दिवस असा दोन टप्प्यात स्वतंत्र साखर कोटा घोषित होईल. पहिल्या पंधरवड्यात घोषित कोट्यातील ४० टक्के मालाची कारखान्यांना पहिल्या सात दिवसांत विक्री करावी लागेल. कारखान्यांनी ज्या दिवशी साखर विकली, त्या दिवसांपासून सात दिवसाच्या आत ती साखर कारखान्याच्या गेटबाहेर म्हणजे बाजारपेठेत विक्रीस उपलब्ध असणे अपेक्षित आहे. त्याद्वारे मुबलक पुरवठा होऊन दरपातळी नियंत्रणात येण्यास मदत होईल.

## संक्षिप्त

### जिल्हा परिषदेला पवित्र पोर्टलमार्फत मिळाले ४६७ गुरूजी

**रत्नागिरी :** पवित्र पोर्टलमार्फत शिक्षकांची विनामुलाखत निवड यादी जाहीर झाली आहे. कोकणातील रत्नागिरी जिल्हा परिषद खासगी शाळांसह इतर शाळांसाठी ४६७ गुरूजी मिळाले आहेत. त्यापैकी ६ वी ते ८ साठी गणित, विज्ञानाचे २४० पदवीधर शिक्षक तर पहिली ते पाचवीसाठी २२७ उपशिक्षक मिळाले आहेत. त्या ठिकाणी शिक्षकांची एक शिक्षकासह ज्या ठिकाणी जागा रिक्त आहेत. त्या ठिकाणी नियुक्ती करण्यात येणार आहे. त्यामुळे रिक्त पदांचा वनवास लवकरच संपणार आहे. जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या काही शाळा खासगी इंग्रजी माध्यमांच्या शाळांनाही टक्कर देत असल्या तरी बहुतांश शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता आणि पायाभूत सुविधांचा अभाव आहे. रत्नागिरी जिल्ह्यात हजारो शिक्षकांच्या जागा रिक्त आहेत. त्यातील काही शिक्षकांच्या पदसाठी जाहिरात देण्यात आली होती. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय शाळा आणि खासगी शैक्षणिक संस्थांमधील शिक्षकभरती प्रक्रियेला अखेर वेग आला आहे. पवित्र पोर्टलच्या माध्यमातून राबवलेल्या मुलाखतीशिवाय नियुक्ती निवड प्रक्रियेची गुणवत्ता यादी २७ ऑगस्टला जाहीर झाली आहे. रत्नागिरी जिल्ह्याला तब्बल ४६७ शिक्षक मिळाले आहेत. शिक्षकांच्या कमतरतेमुळे अनेक शाळांमध्ये दोन वर्ग एकत्र घेण्याची वेळ आली आहे. नव्या शिक्षकांच्या नियुक्तीमुळे अध्ययन-अध्यापन प्रक्रियेतील ताण कमी होवून विद्यार्थ्यांची गैरसोय दूर होणार आहे. त्यामुळे शाळांना आता शिक्षक मिळणार असून शैक्षणिक गुणवत्ता वाढीस मदत होईल.

### समुद्र अचानक खवळल्याने हर्णे बंदरात कोळी बांधवांची धावपळ

**दापोली :** तालुक्यातील हर्णे येथील मच्छिमार बंदर परिसरात शनिवारी २९ ऑगस्ट रोजी समुद्र अचानक खवळल्याने काही काळ वादळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली. जोरदार वाऱ्यासह उसळलेल्या लाटांमुळे किनाऱ्यावर ठेवलेल्या हातगाड्या, जाळी, दोरखंड व अन्य मासेमारी साहित्य सुरक्षित ठेवण्यासाठी कोळी बांधवांची धावपळ उडाली. वाऱ्याचा जोर इतका होता की, साहित्य उडून जाऊ नये यासाठी काही मच्छीमारांना ते पकडून ठेवावे लागले. भारत हवामान विभागाच्या २९ ऑगस्टच्या किनारी हवामान बुलेटिननुसार दक्षिण महाराष्ट्र व गोवा किनारपट्टीवर दक्षिण-पश्चिम ते पश्चिम दिशेने वारे १५ ते २० नॉट्स वेगाने, तर झोत २५ नॉट्सपर्यंत राहण्याची शक्यता होती. मात्र कोणत्याही चक्रीवादळाची सूचना नव्हती. त्यामुळे हवामानाची स्थिती ही जोरदार वारे आणि खवळलेल्या समुद्रामुळे निर्माण झाल्याचे स्पष्ट झाले.

### संगमेश्वरात ८० ग्रामपंचायतींवर प्रशासक

**देवरुख :** प्रशासकीय अडचणींमुळे ग्रामपंचायत निवडणुका होत नसल्यामुळे गेले अनेक महिने संगमेश्वर तालुक्यातील मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींची विकासकामे ठप्प झाल्यात जमा होती. शासनाने याची दखल घेत मुदत संपलेल्या तालुक्यातील ग्रामपंचायतीवर प्रशासक नेमणुका केल्या आहेत. शासन राजपत्रातील अधिसूचनेद्वारे एखाद्या योग्य व्यक्तीची पंचायतीवर प्रशासक म्हणून नियुक्ती करण्याचे अधिकार राज्य शासनास आहेत. याच संदर्भान्वये ग्रामपंचायतीवर प्रशासक नेमण्याचे अधिकार जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना देण्यात आले आहे. याच संदर्भात ज्या ग्रामपंचायतींची मुदत फेब्रुवारी २०२६ मध्ये संपली आहे तसेच काही ग्रामपंचायतींवर प्रशासकांची मुदत सहा महिने पूर्ण झाली आहे, अशा संगमेश्वर तालुक्यातील ८० ग्रामपंचायतींवर प्रशासकांची नियुक्ती करण्यात आली आहे. ग्रामपंचायत (गाव) प्रशासक म्हणून नियुक्ती केलेल्या अधिकाऱ्यांमध्ये आंगवली, चाफवली, दाभोळे, हातीव, हरपुडे, कनकाडी, खडीकोळवण, मोर्डे -विस्तार अधिकारी शंकर घुले. कोसुंब, लोवले, नावडी, सायले, विघ्रवली, फणसवळे, डावखोल पिरंदवणे -विस्तार अधिकारी जयवंत पारशे. आसावली, कोंडीवरे, चिखली, गोळवली, कडवई, कारभाटले, मुरडव, नारडुवे - पंकज निकम. आंबेड खु, नांदळज, पांगरी, मेढे तर्फे फुणगूस, व्यांजणे, उजगाव, डिंगणी- मधुकर कांबळे. मासरंग, मारळ, मुर्शी, मुरादपूर, बुरंबाड, मांजरे, नायरी - प्रणय भायनाक. अंत्रवली, करजुवे, कसबा, धामणी, उमरे, साडवली, कुंभारखाणी खुर्द - रतन देसाई. बामणोली, बेंडे बेलारी बु, चोरवणे, देवळे, देवडे, घोडवली - एस. पी. जाधव. कुरधुंडा, कोंडये, परचुरी, पूर, वाशी तर्फे देवरुख, कोंडकदमराव, निवे बुद्रुक, ओझरे खुर्द - शशिकांत त्रिभुवने. कासारकोळवण, सोनवडे, ताम्हाने, निवे खुर्द, वांझोळे, किरबेट, भडकंबा - तानाजी नाईक, कुचांबे, कुंभारखाणी खुर्द, कळंबस्ते, पाचांबे, रांगव, राजवाडी, तिवरे घेराप्रचितगड, घाटीवळे - अण्णासाहेब बळवंतराव, काटवली, पुर्ये तर्फे देवळे, करंबेळे तर्फे संगमेश्वर, तेर्ये, तिवरेतर्फे देवळे -प्रदीप पाटील यांच्या नेमणुका करण्यात आल्या आहेत.

### रेल्वे ट्रॅकवर आढळला अनोळखी मृतदेह

**खेड :** तालुक्यातील कोतवली येथील सोनपात्र नदीवरील कोकण रेल्वे पुलावर सुमारे ५० ते ५५ वर्षे वयोगटातील एका अनोळखी पुरुषाचा मृतदेह आढळून आला. हा इसम रेल्वेतून पडल्याने गंभीर दुखापत होऊन त्याचा मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे ही घटना २९ ऑगस्ट रोजी सकाळी १०.३० वाजण्यापूर्वी घडल्याचे पोलिस नोंदीनुसार समोर आले आहे. कोतवली येथील सोनपात्र नदीवरील रेल्वे पुलावर मैल दगड क्रमांक ११६/६ जवळ सदर पुरुषाचा मृतदेह आढळून आला. मृत व्यक्तीच्या अंगावर आकाशी रंगाचा गोल गळ्याचा हाफ शर्ट असून त्याने हाफ पॅन्ट परिधान केली होती. त्याच्या डाव्या पायाला, डाव्या हाताला तसेच डोक्याला गंभीर स्वरूपाच्या जखमा झाल्या होत्या. उजव्या हाताला किरकोळ दुखापत झाली होती. मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाल्याने त्याचा मृत्यू झाल्याचे नमूद करण्यात आले आहे.

### दापोलीत प्रवाशाचा उपचारादरम्यान मृत्यू

**दापोली :** दापोली एसटी स्थानकातील कॅन्टीनलगत असलेल्या प्रवासी बसण्याच्या शेडमध्ये आढळून आलेल्या कुंदन आत्माराम महाडीक यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची नोंद दापोली पोलिसांनी केली आहे. कुंदन महाडीक हे मुंबईतील वरळी परिसरातील रहिवासी होते. २८ ऑगस्ट रोजी रात्रीच्या सुमारास त्यांना दापोली उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचार सुरू असताना त्यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी दापोली पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# बॉक्साईट प्रकल्पाची जनसुनावणी होणार नाही! - मंत्री उदय सामंत

**राजापूर : पुढारी वृत्तसेवा**

सागवे परिसरातील प्रस्तावित बॉक्साईट खनिज उत्खनन प्रकल्पाविरोधात सागवे हायस्कूल येथे आयोजित संघर्ष मेळाव्यात मच्छीमार, शेतकरी, ग्रामस्थ आणि विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी एकवटले. प्रकल्पाला तीव्र विरोध करण्याचा निर्धार व्यक्त होत असतानाच उद्योगमंत्री तथा रत्नागिरीचे पालकमंत्री उदय सामंत यांनी ७ सप्टेंबर रोजी नियोजित बॉक्साईट प्रकल्पाची जनसुनावणी होणार नाही, असे स्पष्ट आश्वासन दिले. त्यांच्या या घोषणेचे उपस्थित जनतेने जोरदार स्वागत केले.




पालकमंत्री सामंत म्हणाले, जिल्ह्यावर संकट येणार नाही, याची खात्री तुम्हाला असायला हवी. आमदार म्हणून जनतेचा विरोध म्हणजे माझा विरोध, ही भूमिका किरण सामंत यांनी मांडली आहे. पालकमंत्री म्हणून शासनाची भूमिका मांडण्यासाठी आलो आहे. ७ तारखेची जनसुनावणी होणार नाही. एखाद्या प्रकल्पासाठी संघर्ष करण्याची वेळ भविष्यात कोणावरही येणार नाही, हा माझा शब्द आहे. जबरदस्तीने कुठेही काही होणार नाही. जनतेला जे हवे आहे, ते करण्याची आमची आणि सरकारची भूमिका आहे. सरकारमध्ये असलो तरी जनतेशी बांधील आहे. आम्हीही याच मातीतले आहोत. कोकणच्या लाल मातीवर अन्याय होऊ देणार नाही, असे सामंत यांनी ठामपणे सांगितले. दोन हजार कोटी रुपयांच्या प्रकल्पांचे स्वागत केले म्हणून बॉक्साईट प्रकल्पाचेही स्वागत करू, असे नाही, असे स्पष्ट करत त्यांनी कोकणच्या निसर्गाचे नुकसान करणाऱ्या प्रकल्पांबाबत सावध भूमिका घेतली. उगाच आगाऊपणा करून कोकणाचे निसर्गसौंदर्य खराब करू नका, असा इशाराही त्यांनी दिला. स्थानिक पातळीवर बचत गटांच्या माध्यमातून काजू बोंडापासून सिरप निर्मितीसारख्या शाश्वत उद्योगांना चालना देण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. 'लाडकी बहीण' योजना बंद होऊ देणार नसल्याचेही त्यांनी सांगितले.

आमदार किरण सामंत यांनी संघर्ष मेळाव्याला यश मिळेल, असा विश्वास व्यक्त केला. शिट्टी वाजण्यापूर्वी पळू नका. प्रत्येक काम लगेच झाले पाहिजे, अशी अपेक्षा करू नका. आमदार म्हणजे झेरॉक्स मशीन नाही. काही गोष्टी टप्प्याटप्प्याने कराव्या लागतात; मात्र यश नक्की मिळेल, असे ते म्हणाले.

**संघर्ष करण्यासाठीच जन्म झाला आहे का?**

सुबोध मांजरेकर यांनी राजापूरच्या जनतेला प्रत्येकवेळी संघर्ष का करावा लागतो, राजापूर तालुका संघर्षासाठीच आहे का? आम्ही काय फक्त विरोधच करत राहायचे? प्रत्येकवेळी आमच्या अस्तित्वासाठी किती वर्षे संघर्ष करायचा? असा संतप्त सवाल केला.

# मुंबई बंदरात १४० टन वजनाचा माल उचलताना क्रेन उलटली; दोघे जखमी

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

मुंबई पोर्ट परिसरातील बीपीएस बंदरात १४० मेट्रिक टन वजनाचा माल उचलताना दोन क्रेनचा तोल गेल्याने एक क्रेन जमिनीपासून उचलली जाऊन तिचा पुढील भाग जहाजावर आदळला. या वेळी झालेल्या घर्षणामुळे क्रेनला आग लागली. या घटनेत रणजीतसिंग आणि निशांत सिंह हे दोन क्रेन चालक जखमी झाले असून त्यांना सेंट जॉर्ज रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. ही घटना रविवारी रात्री आठच्या सुमारास घडली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मुंबई पोर्टमधील बीपीएस बंदरात बार्बाडोसच्या ध्वजाखालील 'व्हिएंना' हे जहाज उभे होते. या जहाजातील १४० मेट्रिक टन वजनाचा माल 'बरकत' कंपनीच्या दोन क्रेनच्या मदतीने बाहेर काढण्याचे काम सुरू होते. माल उचलत असताना एका क्रेनला मालाशी जोडलेला पट्टा असमतोल झाल्याने निघून गेला. त्यामुळे मालाचा संपूर्ण भार दुसऱ्या क्रेनवर आला. अचानक आलेल्या या अतिरिक्त भारामुळे दुसरी क्रेन जमिनीपासून वर उचलली गेली. त्यावेळी क्रेनचा पुढील दुर्बिणीसारखा वाढवता येणारा भाग (टेलिस्कोपिक बूम) जहाजावर आदळला.

या धडकेत झालेल्या घर्षणामुळे क्रेनला आग लागली. घटनेची माहिती मिळताच मुंबई पोर्टमधील अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेतली आणि तत्काळ आग विझवली.

## रत्नागिरी जिल्ह्यात यंदा पावसाची २७ टक्के तूट!

**रत्नागिरी:** कोकणातील रत्नागिरी जिल्ह्यात जून, जुलै महिन्यात समाधानकारक हजेरी लावल्यानंतर ऑगस्ट महिन्यात पावसाने दडी मारल्यामुळे रत्नागिरी जिल्ह्यात चिंतेचे ढग दाटले आहे. यंदा पावसाने अपेक्षित सरासरी गाठलेली नसून ऑगस्टअखेर सरासरीच्या तुलनेत २७.५० टक्के पावसाची तूट आहे. जून ते ऑगस्टअखेर जिल्ह्यात सरासरी २ हजार ४३८.९९ मिमी इतका पाऊस झाला आहे. गतवर्षी याच कालावधीत ३ हजार २१७ मिमी पाऊस पडला होता. त्यातुलेनत यंदा ७७८.४८ मिमी तर गतवर्षीच्या तूलनेत यंदाच्या पावसात २४.२० टक्क्यांनी घट झाली आहे. राज्यात पावसाची सर्वाधिक तूट सोलापूर, हिंगोली जिल्ह्यात झाली आहे.

कोकणात दरवर्षी मोठ्या प्रमाणात पाऊस पडत असतो. त्यापैकी रत्नागिरी जिल्ह्यात सरासरी ३ हजार ३६४.२२ मिमी इतका पाऊस पडत असतो. त्यामुळे यंदा वार्षिक सरासरीच्या तुलनेत ७२.५० टक्के पाऊस झाला असून २७.५० पावसाची तूट आहे. यंदा जून महिन्यात म्हणावा तितका पाऊस झाला नाही.

# पणदूरमध्ये अंबरग्रीस तस्करीचे 'डील' फसले!

## २.३७ कोटीची २ किलो ३७३ व्हेलची उलटी जप्त; ४ अटकेत

**कुडाळ : पुढारी वृत्तसेवा**

प्रतिबंधित व्हेल माशाच्या उलटी (अंबरग्रीस) तस्करीचा पर्दाफाश करत एलसीबीने कुडाळ-पणदूर परिसरात सुमारे २ किलो ३७३ ग्रॅम अंबरग्रीस जप्त केले. आंतराष्ट्रीय बाजारात त्याची किंमत सुमारे २ कोटी ३७ लाख ३० हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणी स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने स्थानिक चौघांना ताब्यात घेतले बसून त्यांच्यावर कुडाळ पोलिस स्थानकात गुन्हा दाखल केला आहे. तसेच तस्करीसाठी वापरलेली मोटारसायकल आणि कारसह पोलिसांनी एकूण २ कोटी ४६ लाख रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेतला आहे. ही कारवाई शनिवार २९ ऑगस्ट रोजी सायंकाळी उशिरा करण्यात आली.



या कारवाईमुळे सिंधुदुर्गातील अंबरग्रीस तस्करीचे कनेक्शन पुन्हा चर्चेत आले असून, या प्रकरणामागे आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास आता पोलिसांकडून सुरू आहे. एलसीबीचे पथक कुडाळ पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना काही व्यक्ती प्रतिबंधित व्हेल माशाच्या उलटी सदृश पदार्थाची तस्करी होणार असल्याची विश्वसनीय माहिती मिळाली. माहिती मिळताच पोलिसांनी पणदूर-कडावल रस्त्यालगत पणदूरतिठा नजिकच्या वळणावर सापळा रचला. यावेळी पंच, वजनकाटाधारक आणि वनरक्षक यांच्या उपस्थितीत कारवाईची तयारी करण्यात आली. काही वेळातच काळ्या रंगाची होंडा युनिकॉर्न मोटारसायकल आणि ग्रे रंगाची मारुती सुझुकी एर्टिगा अशी दोन वाहने तेथे आली. पोलिसांनी दोन्ही वाहनांची व आतील व्यक्तींची तपासणी केली असता त्यांच्याकडील सॅक मध्ये लपलेला २ किलो ३७३ ग्रॅम वजनाचा अंबरग्रीस आढळून आला. या प्रकरणी संकेत संतोष चव्हाण (२६, रा. रवळनाथनगर, ओरोस, मूळ रा. निरूखे), महेश लक्ष्मण रेवणकर (३५, सध्या रा. कुवारबांव, रत्नागिरी, मूळ रा. रेवंडी, मालवण), अमेय पुंडलिक देसाई (३१, रा. रवळनाथनगर, ओरोस) आणि अमित अरुण अणावकर (३९, रा. अणाव, कुडाळ) या चौघांना पोलिसांनी ताब्यात घेतले. पंचनामा करून अंबरग्रीस व कार असा एकूण २ कोटी ४६ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याबाबतची फिर्याद एलसीबीचे पोलीस कॉन्स्टेबल अमर कांडर यांनी कुडाळ पोलीसात दिली आहे.

**IN THE PUBLIC TRUSTS REGISTRATION OFFICE, GREATER MUMBAI REGION, MUMBAI**

1st floor, Sasmira Building, Sasmira Road, Worli, Mumbai 400 030.

**PUBLIC NOTICE ENQUIRY**

**CHANGE REPORT NO. DYCC/5870/2026**

u/s. 22 of the Maharashtra Public Trusts Act, 1950

**Mr. Bharat Kumar Taparia** ... Reporting Trustee

In the matter of **"Bombay Hospital Trust"** P.T.R.No. **E-609** (Mum)

**To,**
ALL CONCERNED HAVING INTEREST,

WHEREAS **Mr. Bharat Kumar Taparia,** the Reporting Trustee has filed the above Change Report Under Section 22 of the said Maharashtra Public Trusts Act, 1950 for bringing the below described property on the record of the above- named trust and an inquiry is to be made by the Deputy Charity Commissioner, Greater Mumbai Region, Mumbai,

**"Whether this property is the property of the Trust and could be registered in the Trust name of the Trust"**

**DESCRIPTION OF THE PROPERTY**

Immoveable property

**"The Hospital Building known as 'Bombay Hospital Trust from Nava Raipur Atal Nagar Vikas Pradhikaran, vide registered Lease Deed dated 20.01.2026 for 90 (30+30+30) years having details as under for development of super Speciality Hospital :-**

**"Land admeasuring 61,444.4421 square meter (15.18 Acre) bearing Plot No. LI/S37/R3 in Section 37, Village-Khapri, Taluka- Mandir Hasaud, Distt. Raipur, Chhatishgarh"**

**Date of Agreement: 22nd January, 2026:**

| | |
|---|---|
| a. Land Value | Rs. 6,13,82,998/- |
| b. (-) Discount on payment | Rs. 30,69,150/- |
| a-b Effect land Value | Rs. 5,83,13,848/- |
| c. Lease Rent | Rs. 21,11,441/- |
| d. Land registration charges | Rs. 25,39,669/- |
| e. Other expenses | Rs. 1,79,300/- |
| a-b+c+d+e Total Costs | Rs. 6,31,44,258/- |

District and sub-district :
**Sub Registrar Office, Nava Raipur**
**Tehsil-Raipur, Distt. Raipur (Chhatishgarh)**

This is to call upon you to submit your objections, if any in the matter along with the evidence so as to reach the same at the office address referred hereinabove within 30 days from the publication of this public notice. Objections received thereafter will not be considered.

Given under my hand and seal of the Deputy Charity Commissioner, Greater Mumbai Region, Mumbai.

This 12th day of the August of 2026.

Seal

**Sd/-**
**Superintendent- J,**
**Public Trusts Registration office,**
**Greater Mumbai Region, Mumbai.**

**जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेड (परिसमापनाधीन)**

नोंदणीकृत कार्यालय - स्टर्लिंग सेंटर, ४०१-४०७, ४था मजला, डिवाईन चाईल्ड हायस्कूल समोर, अंधेरी कुर्ला रोड, चकाला, अंधेरी पूर्व, मुंबई महा. ४०००९३

सीआयएन : L99999MH1992PLC066213

(माननीय एनसीएलटीच्या दिनांक २६ नोव्हेंबर २०२४ च्या आदेशानुसार परिसमापन प्रक्रियेतून जात असलेली कंपनी)

**ई-लिलावासाठी जाहीर घोषणा**

दिवाळखोरी आणि नादारी संहिता, २०१६ आणि त्याअंतर्गत तयार केलेल्या नियमांनुसार नोटीस

खाली स्वाक्षरी करणारे हे सर्वसामान्य लोकांना इथे सूचना देत आहेत की जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेड (अवसायनात) (**''कॉर्पोरेट कर्जदार''**)च्या मालकीच्या ६ (सहा) मालमत्तेच्या (खाली दिलेल्या तक्त्यात वर्णन असलेल्या) विक्रीसाठी प्रस्ताव मागण्यात येत आहेत, या मालमत्ता कॉर्पोरेट कर्जदाराच्या अवसायनातील संपत्तीचा नादारी आणि दिवाळखोरी संहिता, २०१६ (**''आयबीसी''**) च्या तरतुदींनुसार तसेच त्याअंतर्गत नियम आणि रेग्युलेशन्सचा भाग असून 'जे आहे जिथे आहे,' 'जे आहे काय आहे,' 'जे काही आहे तेथे आहे' आणि 'कोणत्याही मदतीशिवाय' आधारावर आणि कोणतेही प्रतिनिधित्व, वॉरंटी किंवा नुकसानभरपाईशिवाय त्यांची विक्री होईल.

खाली स्वाक्षरी करणारे यांच्याद्वारे ही विक्री ई-लिलाव प्लॅटफॉर्म बँकनेट (पूर्वीचे ईबिक्रे)च्या माध्यमातून https://ibbi.baanknet.com (**ई-लिलाव प्लॅटफॉर्म**) आयबीबीआय (दिवाळखोरी प्रक्रिया) नियम, २०१६ चा नियम ३२ आणि मालमत्ता विक्री प्रक्रिया करार दिनांक ऑगस्ट ३१, २०२६ (**''एएसपीएम''**) नुसार होणार आहे. सर्व इच्छुक बिडर्सना विनंती आहे की त्यांनी सर्व पात्रता निकष दस्तावेज आणि बयाणा रक्कम हे संबंधित एएसपीएम्सच्या कलम ४ (पात्रता निकष दस्तावेज) मध्ये नमूद करण्यात आलेल्या दस्तावेज प्रस्तुती नियमांनुसार अनिवार्यपणे, आणि केवळ ई-लिलाव प्लॅटफॉर्मवरच प्रस्तुत करावेत.

| ई-लिलावाच्या महत्त्वाच्या तारखांचे वेळापत्रक | |
|---|---|
| ई-लिलाव प्लॅटफॉर्मवर पात्रता कागदपत्रे आणि कलम २९अ ( २९) हमीपत्र सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ | मंगळवार, १५ सप्टेंबर २०२६, सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत (युटीसी+५.३०) |
| ई-लिलाव प्लॅटफॉर्मवर बयाणा रक्कम (**''ईएमडी''**) जमा करण्याची अंतिम तारीख आणि वेळ: | मंगळवार, १५ सप्टेंबर २०२६, सायंकाळी ५:३० वाजेपर्यंत (युटीसी+५.३०) |
| ई-लिलावाची तारीख आणि वेळ | शुक्रवार, १८ सप्टेंबर २०२६, दुपारी १२:०० ते सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत (युटीसी+५.३०) |
| अंतिम विक्री मोबदला भरण्याची अंतिम तारीख | अधोस्वाक्षरीकारांकडून अंतिम विक्री मोबदल्याच्या देयकाची मागणी पत्र जारी केल्यापासून साठ (६०) दिवसांच्या आत |

*रक्कम भारतीय रुपयांमध्ये*

| अनु. क्र. | मालमत्तेचे वर्णन | मालमत्ता आयडी | लिलाव आयडी | राखीव किंमत* | बयाणा रक्कम (ईएमडी) | वाढीव मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मारुती सुझुकी SX4 VDI DL3CBU5685 | ३०५९ | ४६८२ | १,१५,१४६ | ११,५१५ | ५,७५७ |
| २ | मारुती सुझुकी - ईको ग्रीन ५-सीटर DL2CAQ4409 | ३०६१ | ४६८३ | ९८,०२२ | ९,८०२ | ४,९०१ |
| ३ | मारुती सुझुकी - स्विफ्ट डिझायर VXI BS IV MH02EK5147 | ३०६५ | ४६८४ | २,२६,४५४ | २२,६४५ | ११,३२३ |
| ४ | मारुती सुझुकी - स्विफ्ट डिझायर VXI BS IV MH02EK5144 | ३०६७ | ४६८५ | २,२६,४५४ | २२,६४५ | ११,३२३ |
| ५ | होंडा सिटी १.५ SV MT (i-VTEC) MH02EK4299 | ३०६८ | ४६८६ | २,९३,४७४ | २९,३४७ | १४,६७४ |
| ६ | ऑडी A6 35 TFSI DL3CCN6403 | ३०५७ | ४६८७ | १२,७९,८८७ | १,२७,९८९ | ६३,९९४ |
| **मालमत्तांचे ठिकाण खसरा क्र. ११४०-४२, लुथरा इस्टेट, रजोकरी, नवी दिल्ली, DL११००३८, भारत** | | | | | | |

*कर, उपकर, शुल्क, जकात, हस्तांतरण शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क, प्रीमियम आणि विक्री पूर्ण करण्यासाठी लागणारे इतर सर्व लागू खर्च वगळून; ज्याचे सविस्तर वर्णन संबंधित ASPMs च्या कलम १९ (खर्च आणि कर परिणाम) मध्ये दिले आहे. अधोस्वाक्षरीकार किंवा नुकसानभरपाई प्राप्त पक्ष (संबंधित ASPMs मध्ये परिभाषित केल्यानुसार) यांच्याकडून कोणतेही प्रतिनिधित्व, हमी किंवा नुकसानभरपाई दिली जाणार नाही.

**महत्त्वाच्या नोंदी:**

१. पोर्टलवर वर नमूद केलेल्या ६ (सहा) मालमत्तांसाठी ६ (सहा) स्वतंत्र ई-लिलाव आयोजित केले जातील।
२. ही विक्री सूचना संबंधित ASPMs सोबत वाचली जावी, ज्यामध्ये मालमत्तेचा तपशील, घोषणापत्रे, शपथपत्रे आणि IBC च्या कलम २९अ अंतर्गत पात्रतेसाठी हमीपत्रे, तसेच ई-लिलाव विक्रीच्या सामान्य आणि तांत्रिक अटी व शर्ती समाविष्ट आहेत. हे दस्तऐवज BAANKNET वरील वरील मालमत्ता आणि लिलाव आयडी समोर https://ibbi.baanknet.com/auction-listing येथे किंवा कॉर्पोरेट कर्जदाराच्या www.jetairways.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.
३. इच्छुक बोलीदारांनी आवश्यक पात्रता कागदपत्रे आणि EMD केवळ आणि पूर्णपणे ई-लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे संबंधित ASPMs च्या कलम ४ (पात्रता दस्तऐवज) नुसार विहित मुदतीत सादर करावी, लिक्विडेटरकडे थेट सादर करू नये.
४. ई-लिलाव प्लॅटफॉर्म आणि दस्तावेज आणि बयाणा रक्कम प्रस्तुत करण्यासंबंधी काही चौकशी करायची असेल, तर इच्छुक बिडर्सनी बँकनेटला +९१ ८२९१२२०२२० आणि support.baanknet@psballiance.com वर संपर्क करावा.
५. ई-लिलावाबाबत कोणत्याही चौकशीसाठी, कृपया लिक्विडेटरचे अधिकृत प्रतिनिधी श्री. दर्शिल मशरू (+९१ ९५९४९५५२९४) यांच्याशी jetliquidation@in.ey.com आणि liquidation.jet@gmail.com या ईमेलवर संपर्क साधावा (विषय: "Jet Airways - Delhi vehicles"). कृपया नोंद घ्यावी की पात्रता किंवा बोलींसंबंधी कोणतीही कागदपत्रे लिक्विडेटर, त्यांचे प्रतिनिधी किंवा सल्लागारांकडे सादर केली जाऊ नयेत.
६. हे स्पष्ट करण्यात येते की या सूचनेमुळे अधोस्वाक्षरीकार किंवा जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेड (परिसमापनाधीन) यांच्यावर विक्री पूर्ण करण्याचे कोणतेही बंधन निर्माण होत नाही। कर्जदारांच्या समितीसह (CoC) अधोस्वाक्षरीकारांनी घेतलेला कोणताही निर्णय सर्व इच्छुक बोलीदारांवर अंतिम आणि बंधनकारक असेल.
७. हे स्पष्ट केले जाते की येथे आणि संबंधितमध्ये नमूद केलेल्या मालमत्तेचा तपशील केवळ सामान्य संदर्भासाठी दिला आहे। मालमत्तेच्या वर्णनात किंवा स्थितीत कोणतीही कमतरता/अचूकतेचा अभाव/तफावत/चुकीचे विधान/वगळणे/बदल/तूट किंवा कोणत्याही प्रकारची त्रुटी आढळल्यास (ई-लिलाव पूर्ण होण्यापूर्वी, दरम्यान किंवा नंतर अशी तफावत समोर आली तरीही), नुकसानभरपाई प्राप्त पक्ष (संबंधित मध्ये परिभाषित) कोणतीही कायदेशीर जबाबदारी स्वीकारणार नाहीत। मालमत्तेची विक्री पूर्णपणे ''जसे आहे जेथे आहे'', ''जसे आहे जसे दिसते'', ''जशी स्थिती आहे तशी'' आणि कोणत्याही दाव्यांशिवाय आणि कोणत्याही प्रतिनिधित्व, हमी किंवा भरपाईशिवाय केली जाते.
८. अंतिम विक्री मोबदल्याचा भरणा संबंधित ASPMs च्या कलम १५ (अंतिम विक्री मोबदल्याचा भरणा) आणि १६ (विक्रीची पूर्तता) मध्ये दिलेल्या कालमर्यादा, व्याज तरतुदी आणि जप्तीच्या अटींच्या अधीन आहे.
९. अवसायक, सीओसीच्या सल्ल्यानुसार, कोणतेही कारण न देता आणि लागू कायद्यानुसार अन्यथा अपेक्षित असल्याशिवाय, ई लिलाव प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचा किंवा स्थगित करण्याचा अधिकार राखून ठेवत आहेत.

**स्वाक्षरी/-**
**सतिश कुमार गुप्ता**
**जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेडचे अवसायक**
**आयपी नोंदणी क्र. : IBBI/IPA-001/IP-P00023/2016-17/10056**
**एएफए क्र. - AA1/10056/02/311226/108454**
**एएफए वैधता डिसेंबर ३१, २०२६ पर्यंत**
**ईमेल : liquidation.jet@gmail.com**

**दिनांक : ३१.०८.२०२६**
**ठिकाण : मुंबई**

# अकलोलीच्या दुर्घटनेनंतरही प्रशासनाची सुरक्षा पाण्यातच

## दोन चिमुकल्या भावंडांच्या बळीनंतर अनेक प्रश्न; सुरक्षेचे फलक, जीवरक्षक अन् पोलीस बंदोबस्त कुठे?

**अंबाडी : दीपक देशमुख**

ठाणे जिल्ह्यातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र वज्रेश्वरी परिसरातील अकलोली येथील पवित्र गरम पाण्याची कुंडे भाविकांसाठी श्रद्धास्थान; मात्र तानसा नदीपात्रातील असुरक्षितता पर्यटकांच्या जीवावर उठली आहे. रविवारी नदीपात्रात बुडून १३ आणि १० वर्षांच्या दोन भावंडांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने प्रशासनाच्या सुरक्षाव्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दरवर्षी पर्यटक बुडत असताना प्रशासनाला आणखी किती बळींची प्रतीक्षा आहे? असा संतप्त सवाल ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.



**फलक आहेत; पण पर्यटकांना रोखणार कोण?**

नदीपात्रात जाण्यास मनाई करणारे काही सुरक्षाफलक प्रशासनाने लावले आहेत. मात्र हजारो पर्यटकांच्या गर्दीच्या तुलनेत हे फलक अपुरे असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. स्थानिक दुकानदारांनीही सुरक्षेच्या दृष्टीने फलक लावले होते; मात्र पुराच्या पाण्यात ते वाहून गेले. त्यामुळे धोकादायक भागात ठोस बॅरिकेडिंग, मोठे इशारे आणि सतत देखरेख करण्याची गरज आहे.

अकलोली येथील गरम पाण्याच्या कुंडांमध्ये आंघोळ करण्यासाठी वर्षभर हजारो भाविक-पर्यटक येतात. मात्र पावसाळ्यात तानसा नदीला मोठ्या प्रमाणात पाणी येते. त्यामुळे कुंड परिसरासह नदीपात्र अत्यंत धोकादायक बनते. नदीचे पाणी काही प्रमाणात ओसरल्यानंतरही प्रवाह आणि खोली कायम असताना अनेक हौशी पर्यटक जीव धोक्यात घालून नदीपात्रात उतरतात. पाण्याचा अंदाज चुकला की काही क्षणांतच आनंदाच्या सहलीचे रूपांतर मृत्यूच्या दुर्घटनेत होते.

अकलोलीतील परिस्थितीची गंभीरता यावरूनच स्पष्ट होते की, अनेकदा प्रशासनापेक्षा स्थानिक तरुणच बुडणाऱ्या पर्यटकांच्या मदतीला धावून जातात. स्थानिक दुकानदार विजय पाटील यांनी काही दिवसांपूर्वी चार ते पाच पर्यटकांना बुडण्यापासून वाचविल्याचे सांगितले. दरवर्षी पावसाळ्यात आपण आणि स्थानिक तरुण अनेकांना नदीपात्रातून वाचवत असल्याचे त्यांनी सांगितले. मग ज्या ठिकाणी वारंवार जीवघेण्या घटना घडतात, तिथे कायमस्वरूपी प्रशिक्षित जीवरक्षक का नाहीत? हा प्रश्न आता उपस्थित होत आहे. रविवारी दोन निष्पाप भावंडांचा बळी गेल्याने अकलोलीतील सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. फक्त दुर्घटनेनंतर पंचनामा, मदत आणि आवाहन करण्याऐवजी दुर्घटना होऊच नये यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची गरज आहे. जीवरक्षक, अतिरिक्त पोलिस बंदोबस्त, पुरेसे सुरक्षाफलक, बॅरिकेडिंग आणि नदीपात्रावर सतत नजर ठेवण्याची व्यवस्था तातडीने करण्याची मागणी होत आहे.दरम्यान, अकलोली ग्रामपंचायतीच्या वतीने गर्दीच्या दिवशी दोन कर्मचारी तैनात करण्यात येणार असून अतिरिक्त पोलिस बंदोबस्तासाठी मागणी करण्यात येणार असल्याचे उपसरपंच यतीन पाटील यांनी सांगितले. अकलोलीची कुंडे श्रद्धेचे केंद्र आहेत; ती पर्यटकांच्या मृत्यूचे ठिकाण बनू नयेत. दोन भावंडांचा बळी हा शेवटचा ठरवायचा असेल, तर आता प्रशासनाने केवळ आवाहन न करता ठोस सुरक्षा व्यवस्था उभी करण्याची वेळ आली आहे.

गणेशपुरी पोलिस ठाण्याकडून येथे होमगार्ड तैनात करण्यात आले आहेत. मात्र होमगार्डने केवळ कुंड परिसरात न थांबता नदीपात्रात गस्त घालून पर्यटकांना पाण्यात उतरण्यापासून रोखावे, अशी मागणी स्थानिकांनी केली आहे. शनिवार-रविवार तसेच सुट्टीच्या दिवशी मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असल्याने या काळात अतिरिक्त पोलिस बंदोबस्त देण्याचीही मागणी करण्यात आली आहे.